SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25 std.7th
NOTES- 9(TERM-2)
Subject - Marathi

Prepared by: Renuka Joshi LESSON- ९.यशोगाथा

- **पूर्व उपक्रम – तुम्हाला माहित असलेल्या कोणत्याही पाच उद्योजकांची नावे लिहा.**

**शब्दार्थ.**

१.यशोगाथा - यशाची कहाणी 2. अभियंता - इंजिनियर

३. वंचितपणा - कमीपणा ४. मृदुभाषी - बोलण्यात गोडवा असणारे

प्रश्न १.पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१.सुंदर पिचाई यांचे आई-वडील यांच्याविषयी माहिती लिहा.

उत्तर - सुंदर पिचाई यांची आई लक्ष्मी स्टेनोग्राफर तर वडील रगुनाथा पिचाई जी.इ.सी.या कंपनीमध्ये विद्युत अभियंता म्हणून कार्यरत होते.

2. पिचाई यांच्या शिक्षणाबद्दल माहिती लिहा.

उत्तर - वयाच्या १७ व्या वर्षी सुंदरने आय.आय.टी. ची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केली.खडगपुरच्या महाविद्यालयातून धातुशास्त्राचे शिक्षण घेतले.सुंदर त्यांच्या बचमध्ये नेहमी अव्वल होते.अंतिम परीक्षेत त्यांनी रौप्यपदक जिंकून शिष्यवृत्ती मिळवली. पुढील अभ्यासासाठी ते स्टनफोर्ड विद्यापीठात गेले.तिथून एम .एस.व युनिव्हर्सिटी ऑफ पेनसीलव्हेनियाच्या व्हार्टन स्कूलमधून एम.बी.ए. केले.

३. सुंदर पिचाई यांच्या कामाविषयी थोडक्यात माहिती लिहा

उत्तर - २००४ साली गुगल कंपनीत नोकरीला लागले.गुगलच्या गुगल ड्राईव्ह, गुगल क्रोम आणि क्रोम ऑपरेटिंग सिस्टीमच्या निर्मितीची जबाबदारी समर्थपणे सांभाळल्यामुळे ११ वर्षाच्या सेवेनंतर त्यांना गुगलच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांनी अप्लाईड मटेरियल्समध्ये अभियांत्रिकी आणि उत्पादन व्यवस्थापन,मक्किंन्सी अंड कंपनीच्या व्यवस्थापन सल्लागारमध्ये काम केले.

प्रश्न.2. पुढील शब्द वापरून वाक्ये तयार करा.

१.प्रगती - नवीन तंत्रज्ञानामुळे मानवाची प्रगती झाली.

2. प्रभाव - शिक्षणाचा प्रभाव व्यक्तीच्या वागणुकीवर दिसून येतो.

३. तंत्रज्ञान - तंत्रज्ञानाने सर्व गोष्टी सोप्या होऊ लागल्या.

प्रश्न ३. पुढील शब्दांचे इंग्रजी शब्द सांगा.

१.मुख्य कार्यकारी अधिकारी - Chief executive officer 2. तंत्रज्ञान -Technology

३. धातुशास्त्र – Metallurgy ४. विद्युत - lightning

५. शिष्यवृत्ती - scholarship ६.महाविद्यालय - college

७. प्राध्यापक – professor 8.अभियंता - engineer

प्रश्न ४. विद्युत उपकरणांची नावे लिहा.

उत्तर - टी.व्ही,पंखा,मिक्सर,वाशिंग मशीन, गीझर,मायक्रोवेव्ह,ओव्हन.

पाठानंतरचा उपक्रम - खालील म्हणी पूर्ण करा.

१.झाकली मूठ सव्वालाखाची

2. शितावरून भाताची परीक्षा.

३. दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ.

४. हाजीर तो वजीर.

५. घरोघरी मातीच्या चुली.

६. इकडे आड तिकडे विहीर.

७. सुंठीवाचून खोकला जाणे.

८. काखेत कळसा गावाला वळसा.

९. गर्वाचे घर खाली.

१०. आयत्या बिळात नागोबा.

**Subject Teacher** **HOD** **Co-Ordinator** **Principal**